# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी पुणे – ४४.

## ई-निविदा सुचना क्र.१ सन २०२०-२१ (व्दितीय मागणी)

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी पुणे – ४४. हे सवित्तर सुचनेमध्ये नमुद प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्राधिकरण कार्यालयातील विविध कार्यक्रम तसेच अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी तसेच अतिक्रमण काढलेनंतरचे फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणेबाबत ई-निविदा सुचना क्र.१ सन २०२०-२१ (व्दितीय मागणी) मागवित आहेत. कोऱ्या ई-निविदा नमुना अटी शर्तीसह **www.pcntda.org.in** अथवा **www.mahatenders.gov.in** वर दर्शविल्याप्रमाणे ऑनलाईन दिनांक २६/०८/२०२० रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १०/०९/२०२० रोजी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. प्राप्त निविदा दिनांक १४/०९/२०२० रोजी दुपारी १५.०० वाजता उघडल्या जातील.

जा.क्र./विप्रा/जनसंपर्क/ /२०२०-२१
दि.

**सही/--**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी**
**पुणे – ४४.**

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन, आकुर्डी, पुणे-४४

दुरध्वनी क्र. ०२०-२७६५२९३४/३५

---

# ई-निविदा सुचना क्र.१ सन २०२०-२१ (व्दितीय मागणी)

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे -४४ हे अनुभवी फोटोग्राफर तसेच व्हिडीओ शुटींग करणे या कामाकरीता प्राधिकरण कार्यालयातील विविध कार्यक्रम तसेच अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी व अतिक्रमण काढलेनंतर चे फोटो काढणे य कामाकरिता नोंदणीकृत अनुभवी एजन्सीकडून ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | एक वर्षाचा अंदाजीत रु.(Estimated Cost) | बयाणा रक्कम रु. | निविदा कालावधी | ई-निविदा फॉर्म फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी व अतिक्रमण काढलेनंतर चे फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे. | ३.३० लाख | ३३००/- | १ वर्षे | रु.५६०/- GST सह |

| | |
|---|---|
| Online निविदा खरेदी व तयारीचा कालावधी | दि. २६/०८/२०२० वेळ १०.०० पासुन ते दि.१०/०९/२०२० रोजी १७.०० पर्यंत |
| Online निविदा बंद होण्याची वेळ | दि. १०/०९/२०२० रोजी १७.०० पर्यंत |
| निविदा सादर करण्याचा कालावधी Submission | दि. २६/०८/२०२० वेळ १०.०० पासुन ते दि. १०/०९/२०२० रोजी १७.०० पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. १४/०९/२०२० वेळ दुपारी १५.०० वा. |

**टिप** :-१) ई-निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या www.pcntda.org.in **or** www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) निविदेबाबतचे पुरवणी किंवा शुध्दीपत्रक हे वेब साईट वरच प्रसिध्द केले जाईल. यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात दिली जाणार नाही.

**सही/--**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,**

**नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे - 44**

**दुरध्वनी क्र. 020-27652934/35**

## निविदा सुचना क्र.१ सन २०२०-२१ (व्दितीय मागणी)

**प्राधिकरण कार्यालयातील विविध कार्यक्रम तसेच अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी व अतिक्रमण काढलेनंतर चे फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे या कामाकरीता निविदा**

**(DTP)**

# चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे -४४.

**वेबसाईट - www.pcntda.org.in**

**ई-मेल – pro@pcntda.org.in** **दुरध्वनी क्र.२७६५२९३४/३५/२७१६६००९**

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण
निगडी, पुणे - 44

**विषय : - कार्यालयातील विविध कार्यक्रम तसेच अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी व अतिक्रमण काढलेनंतर चे फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे.**
**संदर्भ :- दै.------------------ (पुणे) मधील जाहिरात दि.-------------------**

**महोदय,**

1) मी/आम्ही वरील विषयाचे सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये ई- निविदा भरत आहे/आहोत.
२) मी / आम्ही माहितीपत्रकातील पात्रतेच्या अटी नुसार ई -निविदा भरण्यास पात्र असुन , माझ्या /आमच्या पात्रतेबाबत पुराव्याची कागदपत्रे Online सादर केली आहेत.
३) नापरतावा फॉर्म फी रक्कम रु.५०० + GST, तसेच १% बयाणा रक्कम रु.३३००/- Netbanking e-paypent gateway व्दारे SB MOPS मध्ये online जमा केली आहे.
4) मी/आम्ही निविदा सोबतच्या माहितीपत्रकातील अटी व शर्ती वाचले असून ते मला /आम्हांला मान्य आहेत व त्यासर्व अटी व नियम माझे/आमचे वर बंधनकारक राहतील हे मला/आम्हांला मान्य आहे.

निविदा धारकाची सही :- -------------------------------

निविदा धारकाचे नाव :- --------------------------------

संस्थेचे नाव :- ---------------------------------------

पत्ता :- ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

दुरध्वनी क्र. :- ----------------------------------------

(कार्यालय) --------------------------------------------

मोबाईल नं :- 1)---------------------------------------

2)---------------------------------------

ई-मेल आयडी :- -------------------------------------

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे - 44

**-: निविदा अटी व शर्ती :-**

1) निविदेची फॉर्म फी रु.५००/- + GST सहीत एकुण रु.५६०/-, १% बयाणा रक्कम Netbanking e-paypent gateway द्वारे www.mahatenders.gov.in या वेबसाईट वरील सुचनेप्रमाणे SB MOPS मध्ये online जमा करावी.
2) निविदा ग्राहयता कालावधी (Bid Validity Period) निविदा सादर (Submission) केल्याच्या दिनांकापासून १२० दिवसांसाठी ग्राहय राहील.
3) यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्या अगोदर सुरक्षा अनामत रक्कम रु.10,000/- (रुपये दहा हजार फक्त) D.D व्दारे कार्यालयाकडे जमा करावी लागेल . सुरक्षा अनामत रक्कम म्हणून 1 वर्षासाठी बिनव्याजी ठेवावी लागेल . काम पूर्ण झालेनंतर संबधित क्षेत्रिय अधिकारी यांचे प्रमाणपत्रानंतर एकूण सुरक्षा अनामत रक्कम परत करणेत येईल.
4) यशस्वी निविदाधारकाने भरलेली बयाणा रक्कम त्याच्या इच्छेनुसार सुरक्षा अनामत रकमेत रुपांतरीत होऊ शकेल, अन्यथा बयाणा रक्कम ही पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम भरलेनंतर परत करण्यात येईल.
5) निविदे सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

a) मुंबई दुकाने अधिनियम 1981 अन्वये योग्य त्या संस्थेने दिलेला वैध दुकान परवान्याची साक्षांकित प्रत.
b) पॅनकार्डची साक्षांकित प्रत.
c) मागील ३ वर्षाचे आयकर विवरण पत्रक (वित्तिय वर्ष सन २०१६- १७, २०१७-१८, २०१८-१९)
d) अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र.
e) शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयात फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे या कामाचा अनुभव आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्र विहित नमुन्यातीलच जोडणे आवश्यक आहे.

6) मान्य केलेले दर व कामाचा कालावधी कार्यादेश दिल्यापासून 1 वर्षासाठी असेल. आवश्यकता वाटल्यास तेच दर व कामाचा कालावधी पुढील 1 वर्षाकरीता वाढविणेत येईल.
7) प्राप्त निविदा मधून न्युनतम दर मान्य करणेत येतील.
8) मंजूर निविदा धारकाने आठ दिवसांच्या आत सुरक्षा अनामत रकमेचा प्राधिकरणात भरणा करावा. करारनामा केलेनंतर नेमणुकीचे पत्र देणेत येईल व आवश्यकतेनुसार नेमणूक केलेल्या संस्थेला वेळोवेळी काम देणेत येईल.
9) कार्यारंभ आदेश दिले नंतर कळविण्यात आलेल्या दिनांकास आवश्यक संख्येने फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. अन्यथा त्या दिवशी इतर/ बाहेरील फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर यांच्या कडून काम करुन घेण्यात येईल व झालेला खर्च निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.
10) फोटो काढतांना व शुटींग करतांना कॅमेरा व अनुषंगिक साहित्याची तसेच जिवित व इतर मालमत्तेची संपूर्ण जबाबदारी मंजूर निविदाधारकाची राहील. यासाठी आवश्यकते प्रमाणे विमा काढणेची जबाबदारी निविदा धारकाची राहील.
11) योग्य दर्जाच्या पेपरवर रंगीत फोटो असणे आवश्यक आहे. त्यावर प्रत्येक वेळी दिनांक व वेळ असणे आवश्यक आहे. तसेच C. D./ V. C. D. वर प्रसंगाचे संक्षिप्त नावे/वर्णन परमनंन्ट मार्कर ने लिहिण्यात यावे.
12) व्हीडीओ शुटींग योग्य दर्जाचे स्वच्छ असले पाहिजे तसेच त्यात दिनांक व वेळेचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे.

13) फोटोचा आकार व संख्या तसेच सी. डी. चा कालावधी व संख्या संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांच्या निर्देशाप्रमाणेच करणेचे/ पुरविणेच आहे. अन्यथा जादा/ अवास्तव फोटो संख्या/ व्हिडीओ शुटींग, कालावधीचे देयक नाकारण्यात येईल.

14) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारे फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर निविदा धारकास दुरध्वनी अथवा समक्ष सुचना दिलेनंतर त्वरीत उपलब्ध करुन द्यावयचे आहेत.

15) निविदा धारकाकडे व्यवसाय परवाना असणे आवश्यक आहे.

16) निविदा धारकाकडे तसेच त्यांचे प्रतिनिधीकडे त्वरीत संपर्क साधता येतील अशी व्यवस्था, मोबाईल/ दुरध्वनी संपर्क यंत्रणा उपलब्ध असली पाहिजे.

17) अतिक्रमण कार्यवाही करावयाच्या वेळी डिमॉलिशनच्या कामाची अंमलबजावणी होत असतांना किंवा होणेपूर्वी अथवा नंतर निविदा धारकांकडील कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारची इजा किंवा नुकसान झालेस त्यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. ती जबाबदारी सर्वस्वी निविदा धारकाची राहील. प्राधिकरण झालेल्या नुकसानाची भरपाई रक्कम अदा करणार नाही निविदा धारकांचे कर्मचारी यांचे कायदेशीर दायित्वाची जबाबदारी पूर्णपणे निविदा धारकावर राहील.

18) निविदा प्रपत्र पाकीट क्र. 2 मधील 'अ' ते 'ड' मध्ये नमूद बार्बीची पहिली व दुसरी प्रत या सर्व प्राप्त दरांची एकत्रितरित्या बेरीज करुन यशस्वी निविदाधारक ठरविण्यात येईल.

19) प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तीमधील एखाद्या अटीवर वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्दशनास आणून देणेत येईल. त्यांनी वादावर दिलेला निर्णय हा अंतिम व बंधनकारक असेल.

20) फोटोग्राफी संस्थेच्या कर्मचाऱ्यांना ओळखता यावे यासाठी ओळखपत्र, बिल्ले किंवा इतर साहित्याचा वापर निविदा धारकाने करावयाचा आहे.

21) निविदा धारकाने त्यांचेकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांनी अनधिकृत बांधकामे हटविताना पुरेशी काळजी घेतली पाहिजे, त्यांना योग्य ती सुरक्षा साधने निविदाधारकाने पुरविली पाहिजेत. तसेच प्राथमिक औषधोपचाराचे साहित्य त्यांनी सोबत ठेवले पाहिजे.

22) काही तांत्रिक अडचणींमूळे कर्मचारी उपलब्ध करुन न दिलेस प्राधिकरण सदरील काम बाहेरील एजन्सीकडून करुन घेईल व त्यांची देयके बाजारभावानुसार निविदाधारकाचे देय रक्कमेतून वजा/वसूल करणेत येईल.

23) निविदाधारकाकडे कार्यरत असणारा कर्मचारी वर्गाचे वय हे 18 वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

24) मिनीमम वेजेस ॲक्ट अंतर्गत निविदाधारकांकडे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार देणे निविदाधारकास बंधनकारक आहे.

25) सदर निविदा स्विकृतीचे व कोणत्याही स्तरावर नाकारण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहतील.

26) फोटो काढण्यासाठी व व्हिडीओ शुटिंग करण्यासाठीची सुचना मंजुर निविदाधारक यांना दिल्यानंतर जर कार्यक्रम अचानक रद्द करणे भाग पडलेस ठेकेदारास निविदाधारकास कोणतेही देयक अथवा नुकसान भरपाई प्राधिकरणामार्फत देण्यात येणार नाही.

27) **व्हिडीओ शुटिंगचे देयकासाठी प्रत्यक्षात जेव्हा व्हिडीओ शुटिंग सुरु होईल व संपेल (प्रत्यक्षात शुटींगचा कालावधी) तेवढाच कालावधी ग्राहय धरण्यात येईल.**

28) निविदाधारकाने आपले दर हे आयकर, वस्तु व सेवाकर किंवा शासनाचे इतर कोणतेही प्रचलित कर धरुन सादर करावे.

29) शासनाचे प्रचलित शासन निर्णयानुसार कर आकारणी करण्यात येईल.

30) निविदा स्विकृती, दिनांक व वेळ वृत्तपत्रातील जाहीराती मध्ये प्रसिध्द केला जाईल. सविस्तर माहिती या कार्यालयाच्या www.pcntda.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी ई-मेल pro@pcntda.org.in व दुरध्वनी क्रं.-०२० -२७१६६००९ येथे संपर्क साधावा.

31) ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियेत लिफाफा क्र.1 मध्ये खालील कागदपत्रांची स्कॅन कॉपी सादर (Upload /Submission) करणे आवश्यक आहे.

1) **लिफाफा क्र.1 :- तांत्रिक लिफाफा**

a) निविदा फॉर्म फी रू. 500/- + GST

b) बयाणा रक्कम रू. 3300/-

c) मुंबई दुकाने अधिनियम 1981 अन्वये योग्य त्या संस्थेने दिलेला वैध दुकान परवान्याची साक्षांकित प्रत.

d) पॅनकार्डची साक्षांकित प्रत.

e) मागील 3 वर्षाचे आयकर विवरण पत्रक (वित्तिय वर्ष सन 2016-17, 2017-18, 2018-19)

f) अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र.

g) फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे या कामाचे 1 वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र

32) 2) **लिफाफा क्र.2 :- दराची निविदा**

लिफाफा क्र.1 मध्ये नमुद केलेली आवश्यक कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र निविदा धारकाचे online लिफाफा क्र.2 उघडण्यात येईल. अन्यथा लिफाफा क्र. 2 उघडली जाणार नाही.

निविदाधारकाची सही व शिक्का:-

दिनांक:-

मोबाईल नं:-

कनिष्ठ लिपीक

जनसंपर्क व प्रसिध्दी अधिकारी

लेखाअधिकारी

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी

# हमीपत्र

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४४ यांनी प्राधिकरण कार्यालयातील विविध कार्यक्रम तसेच अतिक्रमण निर्मूलन करतांना व करण्यापूर्वी व अतिक्रमण काढलेनंतरचे फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग करणे या कामासाठी ई -निविदा मागविणेबाबतच्या सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण :-

स्वाक्षरी :-

निविदाधारकाचे नांव :-

पत्ता:-

दुरध्वनी / मोबाईल क्र. :-

# अनुभव प्रमाणपत्र

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे - 44.

विषय :- अनुभव प्रमाणपत्र.

मे.------------------------------------------------------------- या संस्थेने या कार्यालयात / कंपनीमध्ये फोटो काढणे व व्हिडीओ शुटींगचे काम केलेले आहे.

| अ.क्र. | फोटो काढणे व व्हिडीओ शुटींग केलेल्या कामाचे वर्ष / कालावधी |
|---|---|
| | |
| | |
| | |

मे.-------------------------------------------------------------------यांचे काम समाधानकारक आहे.

दिनांक :- सही :-
ठिकाण :- कार्यालयाचा शिक्का